प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

# मॉडर्न कला, शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय

गणेशखिंड, पुणे – ४११०१६

नॅक तर्फे पुनर्मूल्यांकन 'अ' दर्जा

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाशी संलग्न क्र. पीयूएन/पी एन./ ए.एस.सी./०८९ (१९९२)
- विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता क्र. एफ–८–२९०/२००६(सी.पी.पी.।)
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाचा सन २०१३ चा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
- DST-FIST पुरस्कृत महाविद्यालय
- DBT STAR योजना पुरस्कृत महाविद्यालय

दूरध्वनी: ०२० २५६३४०२१, २५६३१०९१
फॅक्स: ०२० २५६५०९३१
e-Mail: moderncollege16@gmail.com
Website: www.moderncollegegk.org

एमसीएएस्सी /२०२०-२१/ १५०८ दि. 30/1/2020

प्रति,

मा.प्राचार्य / कलामंडळ प्रमुख

विषय : मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड,पुणे आणि विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **'स्वरमाधुरी संगीत महोत्सव'** स्पर्धेविषयी.

महोदय / महोदया ,

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्,सायन्स ॲण्ड कॉमर्स गणेशखिंड, पुणे- ४११०१६ आणि विद्यार्थी कल्याण मंडळ,पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त सहकार्याने स्वरमाधुरी संगीत महोत्सवाचे आयोजन करीत आहोत. या अंतर्गत शास्त्रीय वाद्य संगीत- (तालवाद्य ), शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य), सुगम संगीत (भारतीय),भारतीय समूहगान, पाश्चिमात्य समूहगान आणि लोकसंगीत वाद्यवृंद या कलाप्रकारांमधील राज्यस्तरीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीची स्पर्धा दि.४ फेब्रुवारी २०२० रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

अभिजात शास्त्रीय संगीताची उपासना करणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व व्यासपीठ निर्माण व्हावे या हेतुने गेली २५ वर्षे ही स्पर्धा आमचे महाविद्यालय यशस्वीपणे आयोजित करत आहे. वर्ष २००४-२००५ पासून पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने या स्पर्धेस आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देऊन ही स्पर्धा यशस्वी करण्यास सहकार्य केले आहे.विद्यावाणी या पुणे विद्यापीठाच्या एफ.एम.वाहीनीने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून या कार्यक्रमाचे प्रक्षेपण करुन सहकार्य केले आहे.

या स्पर्धेसाठी उत्तम नावलौकिक असलेले तज्ञ परीक्षक व या क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींची पारितोषिके वितरणासाठी उपस्थिती हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य.

पत्रासोबत स्पर्धेचा प्रवेश अर्ज व नियमावली पाठवित आहोत. तरी आपण या स्पर्धेची माहिती विद्यार्थ्यांना देऊन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे ही विनंती.

आपले विश्वासू

vjoshi

स्पर्धा समिती प्रमुख

Modern College ★ Ganeshkhind, Pune-16. ★

प्राचार्य

**Principal**

P.E.S.'s Modern College of Arts, Science & Commerce, Ganesh Khind,Pune-16.

## स्पर्धेची नियमावली

१) शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य )
२) शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य)
३) सुगम संगीत (भारतीय )
४) भारतीय समूहगान
५) पाश्चिमात्य समूहगान
६) लोकसंगीत वाद्यवृंद

### १) शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य )

१. प्रत्येक महाविद्यालयातून / परिसंस्थेतून एकापेक्षा अधिक स्पर्धकांस या स्पर्धेस सहभागी होता येईल.
२. सादरीकरणाकरिता किमान ०७ मिनिटे व कमाल १० मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
४. सादर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करण्यात येईल.
५. सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरिता स्वत:ची वाद्ये आणावी लागतील.
६. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय / कर्नाटक यांपैकी कोणत्याही एका शैलीचा वालर करावा लागेल.
७. परिक्षकांचा निर्णय वादनशैली व कौशल्य ,वादनातील नेमकेपणा वादया वरील प्रभुत्व आणि एकुण परिणाम यावर अवलंबून राहील.

### २) शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य )

१. प्रत्येक महाविद्यालयातून / परिसंस्थेतून एकापेक्षा अधिक स्पर्धकांस या स्पर्धेस सहभागी होता येईल.
२.सादरीकरणाकरिता किमान ०७ मिनिटे व कमाल १०मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३.मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
४.सहभागी सपर्धकांना कला सादरीकरणाकरिता स्वत:ची वाद्ये आणावी लागतील.
५.विद्युत स्वर वाद्याचा मुख्य सादरीकरणाचे वाद्य म्हणून वापर करता येणार नाही.
६.भारतीय राग प्रणालीचा वापर करणारी पाश्चिमात्य उगमाची वाद्ये वापरता येतील.
७.सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
८.स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय /कर्नाटक यांपैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
९. परिक्षकांचा निर्णय वादनशैली व कौशल्य ,वादनातील नेमकेपणा वादया वरील प्रभुत्व आणि एकुण परिणाम यावर अवलंबून राहील.

### ३) सुगम संगीत (भारतीय )

१ .प्रत्येक महाविद्यालयातून / परिसंस्थेतून एकापेक्षा अधिक स्पर्धकांस या स्पर्धेस सहभागी होता येईल.
२. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०३ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
४. सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनिटे व कमाल ०६ मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
५.गैरचित्रपटे, गीते, गझल,भजन आणि अभंग या कलाप्रकारात सादर करता येईल.
६.स्वर, ताल,रचना आणि प्रभाव तसेच गीतातील भाव अथवा आशय रसिकांपर्यंत पोहोचविण्यांची क्षमता यावर परिक्षकांचा निर्णय आधारित राहील

**४) भारतीय समूहगान**

१.प्रत्येक महाविद्यालयातून / परिसंस्थेतून एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२.एका चमूमध्ये कमाल ०६ (सहा) गायक आणि कमाल ०३ (तीन ) साथीदारांचा समावेश राहील. गायक देखील सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील

३.चित्रपट गीते सादर करता येणार नाहीत.

४.प्रत्येक चमूला सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनीट व कमाल ०६ मिनीटांचा वेळ उपलब्ध राहील.

५.मंच व वाद्य रचनेकरिता जास्तीत जास्त ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.

६.परिक्षकांचा निर्णय हा केवळ गायनाच्या दर्जावर आधारित राहील. यामधे रंगभूषा, वेषभूषा व चमूच्या पध्दतीवर गुणदान करण्यात येणार नाही.

**५) पाश्चिमात्य समूहगान (Group Song – Western)**

१. प्रत्येक विद्यापीठाची एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२. एका चमूमध्ये कमाल ०६ (सहा) गायक आणि कमाल ०३ (तीन) साथीदारांचा समावेश राहील. तथापि गायक हे सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील.

३. चित्रपट गीते सादर करता येणार नाहीत.

४. प्रत्येक चमूला सादरीकरणाकरिता किमान ०४ मिनीट व कमाल ०६ मिनीटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि मंच व वाद्य रचनेकरिता ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.

५. परिक्षकांचा निर्णय हा केवळ गायनाच्या दर्जावर आधारित राहील. यामध्ये रंगभूषा, वेषभूषा व चमूच्या पध्दतीवर गुणदान करण्यात येणार नाही.

६. सादरीकरणाकरिता निवडण्यात येणारे गीत केवळ इंग्रजी भाषेत असावे असे बंधन नाही.

**६) लोक वाद्यवृंद (Folk Orchestra)**

१. प्रत्येक विद्यापीठाची एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.

२. एका चमूमध्ये साथीदारांसह कमाल १२ (बारा) स्पर्धक सहभागी होऊ शकतील.

३. केवळ मुले / मुली किंवा मिश्र पध्दतीचा समुह यामध्ये सहभागी होऊ शकेल.

४. सादरीकरणाकरिता किमान ०८ कमाल १० मिनीटांचा कालावधी कलावंतांना उपलब्ध राहील.

५. वाद्य, मंच रचनेकरिता कमाल १० (दहा) मिनीटांचा कालावधी राहील.

६. व्यावसायिक साथीदारांना विद्यार्थी कलावंतापासून काही अंतरावर उभे / बसून सादरीकरण करता येईल. मात्र त्यांना चमूचे नेतृत्व करता येणार नाही.

७. लोक संगीतातील ज्या स्वरमालिकांना लोक संगीत म्हणून अधिकृत मान्यता आहे अशा स्वरमालिकांची प्राधान्याने निवड करण्यात यावी.

**टिप : तंबोरा अथवा तानपुऱ्याच्या स्वरसाथीसाठी इलेकट्रॉनिक तानपुरा / मोबाईल ॲप इत्यादी उपकरणांचा वापर मान्य होईल.**

**विद्यार्थी विकास मंडळ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे**
**आणि**
**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे**
**मॉडर्न कला,शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालय,गणेशखिंड,पुणे ४११०१६**

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**राज्यस्तरीय संगीत स्पर्धा**

**प्रवेश अर्ज**

---

स्पर्धकाचे नाव : ______________________________

महाविद्यालयाचे नाव : ______________________________

विद्यापीठाचे नाव : ______________________________

महाविद्यालयाचा पत्ता : ______________________________

स्पर्धकाचा पत्ता : ______________________________

फोन क्र : --------------------------------------------------------

ई मेल :-----------------------------------------------------------

स्वरमाधुरी या संगीत स्पर्धेत मी /आम्ही खालील संगीत प्रकारात भाग घेऊ इच्छितो.

| | | |
|---|---|---|
| १ )शास्त्रीय वाद्य संगीत (तालवाद्य ) | होय | नाही |
| २ )शास्त्रीय वाद्य संगीत (स्वरवाद्य) | होय | नाही |
| ३ )सुगम संगीत (भारतीय ) | होय | नाही |
| ४ )भारतीय समूहगान | होय | नाही |
| ५ )पाश्चिमात्य समूहगान | होय | नाही |
| ६ )लोकसंगीत वाद्यवृंद | होय | नाही |

**सूचना : सांघिक कला प्रकारासाठी सहभागी विद्यार्थ्यांच्या नावांची यादी स्वतंत्रपणे प्रवेश अर्जाबरोबर जोडावी.**
**सर्व प्रवेश अर्ज** swaramadhuri.mgk@gmail.com **या** Email **वर पाठवावेत.**

**अर्जात भरलेली सर्व माहिती खरी असून त्याची मी पूर्ण जबाबदारी घेतो/ घेते. * मी स्पर्धेचे नियम वाचले आहेत आणि मी स्पर्धेच्या नियमांचे पालन करेन . * परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील आणि तो मला मान्य असेल.**

स्पर्धकाची स्वाक्षरी

**दिनांक:** **स्थळ :** **प्राचार्यांची स्वाक्षरी** **महाविद्यालयाचा शिक्का**